क्रमांक/यजिप/साप्रवि/परिषद/२६७०५ /०१४
यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ, दिनांक :- २५.११.२०१४

**प्रति,**

**सन्मा. श्री / श्रीमती ------------------------------------------**

**सदस्य, स्थायी समिती, जिल्हा परिषद, यवतमाळ**

**मुक्काम ---------------------- पोष्ट --------------------**

**तालुका ---------------------- जिल्हाः यवतमाळ.**

**मार्फत :-** **गट विकास अधिकारी, पंचायत समिती -------------------------**

दिनांक १२.११.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचा अहवाल आपले माहिती करिता या सोबत पाठविण्यात येत आहे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

**सचिव,**
**स्थायी समिती**
**जिल्हा परिषद, यवतमाळ.**

**प्रतिलीपी :-**

१] मा.नामदार श्री. -----------------------------------------------------
--------------------------------------------- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२] मा. श्री. -------------------------------------- खासदार / आमदार.
मुक्काम -------------------- पोष्ट -------------- तालुका --------------------
जिल्हा-------------------- यांना माहितीस्तव सविनय सादर.

३] मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, / मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.

४] मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. यवतमाळ यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता.

५] ----------------------------------------- जि. प. यवतमाळ (सर्व खातेप्रमुख) यांना माहिती तथा पुढील योग्य कार्यवाहीस्तव रवाना. आपले विभागाशी संबंधीत असलेले विषय, चर्चा व सुचना यावर नियमानुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल मा.अध्यक्ष, व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या त्वरीत सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच अनुपालन अहवालाच्या २५ प्रती (विहीत प्रपत्रात) तात्काळ सा.प्र.वि.च्या परिषद विभागाकडे सादर कराव्या.

६] गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----------------- (सर्व)

****

## जि.प.स्थायी समिती सभा दिनांक १२.११.१४

दिनांक १२. ११ . २०१४ रोजी दुपारी १- ०० वाजता स्थायी समितीचे सभागृहात मा.अध्यक्ष, जि.प.यवतमाळ तथा सभापती (स्थायी समिती) यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा घेण्यात आली. सभेला जि. प.चे खालील मा. पदाधिकारी, सन्मा. स्थायी समिती सदस्य, खाते प्रमुख, व आमंत्रीत अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा.सौ. आरतीताई ह. फुपाटे | सभापती, (स्थायी समिती) तथा अध्यक्ष, जि.प.यवतमाळ | मा.श्री.अनिल शं. मांगुळकर | उपाध्यक्ष, जि.प. यवतमाळ |
| मा. श्री. नरेंद्र के. ठाकरे | सभापती (शि. व आ. स.) | श्री. सुभाष म. ठोकळ | सभापती (बांध.व अर्थ.स) |
| मा. सौ. लताबाई पां.खांदवे | सभापती (स.क.स.) | मा. सौ.विमलबाई र. चव्हाण | सभापती (म.व.बा.क.) |
| सन्मा. श्री. प्रविण वि. देशमुख | सदस्य | सन्मा. राहुल मा. ठाकरे | सदस्य |
| - | - | सन्मा. श्री.अनिल भ. नरवाडे | सदस्य |
| सन्मा. श्री.अमन ह. गावंडे | सदस्य | सन्मा. सौ. संगीता अ. राजुरकर | सदस्य |
| सन्मा. सौ. उमाताई वि. पिदुरकर | सदस्य | सन्मा.श्री. दिवाकर ध. राठोड | सदस्य |
| **मा. आमंत्रीत अधिकारी (सर्वश्री)** | | | |
| डॉ.शरद कुलकर्णी | प्रभारी मु.का.अ. | अरुण मोहोड | उप मु. का.अ. (सा.) |
| जालींदर पठारे | प्रभारी उप मु.का.अ.(पं) | व्ही.के.मरसाळे | उप मु.का.अ.(बा.क.) |
| ए.एम.नितनवरे | का.अ.बांध क्र.२ | सुरेश शहापुरकर | मु.ले.व वि.अ. |
| श्री.एम.एस.तपासे | का.अ.बांध. क्र.१ | बाबासाहेब जाधव | अधि.अभि. म.वि.वि.कं.यवत |
| ए.एन.निसाळ | उप.कार्य.अभि.(सिंचन) | के.टी. उमाळकर | का.अभि.(पा.पु.) |
| डॉ. के.झेड. राठोड | जि.आ.अ. | डॉ. श्री.दिलीप सोनकुसरे | जि.पशु संवर्धन अधि. |
| पंकज तगलपल्लेवार | कार्य.अभि.म.वि.वि.यवत | जे.आर.राठोड, | कृषि विकास अधिकारी |
| सौ. सुचिता पाटेकर | शि.अ. (प्राथ.) जि.प. यवत. | डॉ.वाल्मीक इंगोले | उप.शि.अ.(माध्य.) |
| विजय साळवे | समाज क.अधिकारी | सी.आर. भावसार | उप का.अ. (नरेगा) |
| सी.बी.उत्तरवार (प्रतिनिधी) | जि.अ.कृ.अ.यवतमाळ | संजय वानखेडे | कृ.अ. (नरेगा) |
| श्री. व्ही.एच.गावंडे (प्रतिनिधी) | का.अ.म.जि.प्रा.यवतमाळ | डी.पी. चौधरी | उप अभि.(यां.)भु.स.वि.यं |
| श्री. विश्वास वालदे | वरि. भु वै.भु.स.वि.य.यवत | पी.डी.मोहेकर | विभाग नियंत्रक म.रा.प.म. |
| डब्ल्यु.यु.नगराळे | का.अ.म.रा.वि.वि.कं.पुसद | ए.वाय. पाटील | उप.अभि.पं.प्र.ग्रा.स.यो. |
| ए.एस.मानकर | स.ले.अ. वित्त विभाग | डी.जे.पाली | शा.अ.(सिंचन) |
| रा.दा. धकाते | शा.अ.जि.ग्रा.वि.य. | एम.एम. गवई | सहा.ले.अ.(स.क.स.) |
| आर.आर. खरोडे | वि.अ. (पंचा.) | श्री. विजय पारवानी | स्विय सहा. मु.का.अ. |
| श्री.भानुदास चरडे | स्वियसहा.उप.मु.का.अ.(सा.) | श्री. आर.बी.कोम्बे | स्विय सहा.सभा.म.व बाक |
| श्री. पी.के.भोंग | स्वि.सहा.मा.अध्यक्ष,जि.प | श्री.एम.एम.आत्राम | स्विय सहा.सभा.स.क.स. |
| श्री.जवादे | क.सहा शि.अ.(प्रा) | श्री. श्रीकांत मडावी | कनि.सहा. सा. प्र. वि. |
| श्री.डी.एम.ठाकरे | आ.सहा.जि.आ.अ. | श्री. दि.अ.पिंपळकर | क.ले.अ.वित्त विभाग |

सर्वप्रथम सचिवांनी मा. पदाधिकारी व सन्मा. स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष, जि.प. यवतमाळ तथा (सभापती , स्थायी समिती ) यांचे पुर्वपरवानगीने सभेचे पुढील कामकाज सुरु केले.

**विषय क्र.१ दिनांक १८.१०.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास मंजुरी देणे.**

**सन्मा सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी मागिल सभेत सन २०११-१२ मध्ये जिल्हा नियोजन समिती मधून शाळा दुरुस्तीसाठी प्राप्त झालेला निधी परत केल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर सचिवाने उक्त प्रकरणी मु.ले.वि.अ. यांचेकडून चौकशी अहवालाची प्रत प्राप्त झाली असुन पुढील कार्यवाही होण्यासाठी बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आली असुन खातेप्रमुखांनी यामध्ये दिरंगाई करणा-या दोषींची नावे कळविल्यास पुढील कार्यवाही करता येईल असे सांगीतले.

**सन्मा सदस्य श्री. प्रविण वि. देशमुख** यांनी जि. प. गव्हमेंट हायस्कुल ही यवतमाळची अति उत्कृष्ट शाळा आहे व तत्कालीन शिक्षण मंत्री यांनी शाळेसाठी निधी उपलब्ध करुन दिला. परंतु प्रशासनाच्या दिरंगाईमुळे निधी खर्च झाला नाही, व निधी खर्च करण्यास परवानगी सुध्दा मिळणार नसल्याचे सांगून विभाग कोणताही असो, निधी खर्च करण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला का यांची पडताळणी करुन जे कोणी दोषी आहेत त्यांचे वर कार्यवाही करण्यात यावी असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती)** यांनी निधी परत जातोच कसा ? याची विचारणा करुन बांधकाम व शिक्षण च्या खातेप्रमुखांना नावे सादर करणेबाबत पत्र द्यावे व दोन्ही विभागानी काय कार्यवाही केली याबाबतचा पाठपुरावा करुन पुढील सभेचे वेळी अहवाल सादर करण्यबाबतचे निर्देश सचिवास दिले.

**सन्मा सदस्य श्री. प्रविण वि. देशमुख** यांनी ३२ लाखाची सुध्दा माहिती देण्यात यावी असे सांगीतले. **त्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी सर्व खातेप्रमुखानी नोंद घ्यावी तसेच निधी खर्च होणेबाबत पाठपुरावा आवश्यक असतो असे सांगुन पशुसंवर्धन, आरोग्य व शिक्षण विभागाने विसंबून राहू नये. बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करणे आवश्यक असतो त्याचप्रमाणे शिक्षण विभागाने रुपये पाच लाख व रुपये ३२ लाख खर्च करण्यास शासनाची मान्यता मिळण्याकरिता शासनाकडे **पाठपुरावा करण्याबाबतचे निर्देश पशुसंवर्धन, आरोग्य व शिक्षण विभागास दिले.**

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी दिरंगाई करणा-यां दोषी अधिकारी कर्मचा-यांवर कार्यवाहीचा ठराव घेण्यात यावा असे सांगीतले. तसेच **सन्मा. सदस्य श्री. प्रविण वि. देशमुख** यांनी पुढील सभेमध्ये दोषींवर कार्यवाही केल्याची माहिती पुरविण्यात यावी त्याचप्रमाणे परवानगीसाठी विभागामार्फत केलेल्या पाठपुरावा संदर्भातील माहिती देण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अनिल भ. नरवाडे** यांनी मागिल सभेत महागाव पंचायत समिती मधील ग्रामपंचायती अंतर्गत लावण्यात आलेले सौर पथ दिवे बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर प्रभारी उप मु.का.अ.(पंचा.) यांनी पर्यावरण मधील पथ दिव्यांची जिल्हयाची माहिती पुरविण्यात आलेली आहे असे सांगुन ग्रामपंचायतीमध्ये नोंदी नसल्यामुळे अद्यावत माहिती प्राप्त झालेली नाही. व १६ पंचायत समिती पैकी ३ पंचायत समितीची माहिती प्राप्त झाली असुन ग्रामसेवकांचा संप सुरु असल्याचे सांगीतले. त्यावर **सन्मा. सदस्य श्री प्रविण वि. देशमुख** यांनी सदरचा विषय गंभीर असुन ग्रामपंचायतींना सुध्दा माहिती नसते असे सांगुन एकच दिवा लावून वेगवेगळया योजनेतून निधी काढल्या जात असल्याची शंका निर्माण होत असल्याचे सांगीतले. सदर्हु विषयावर चर्चा होऊन **मा.सभापती (स्थायी समिती)** यांनी विस्तार अधिका-यांकडून माहिती का येत नाही याची विचारणा करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उक्त प्रकरणी लक्ष पुरविणे गरजेचे असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी सौर पथदिव्याची देखभाल दुरुस्ती कोणाकडे आहे याची विचारणा करुन या संदर्भात त्यांचे ॲग्रीमेंट सह माहिती पुरविण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी मागील सभेत बाभुळगाव तालुक्यातील मौजे चिमणा - बागापुर येथिल शेत सर्व्हे क्र. ३० चे संदर्भात केलेल्या तक्रारीबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. **त्यावर उप मु.का.अ.(म.ग्रा.रो.ह.यो.)** यांनी तक्रारीच्या अनुषंगाने मागविण्यात आलेल्या बाबींवरील अहवाल ग.वि.अ. बाभुळगाव यांचेकडुन अहवाल प्राप्त झाले असुन त्याचे वाचन केले. यावर **सन्मा. सदस्य** यांनी चिमनापुर व बागापुर ही दोन वेगवेगळी ठिकाणे असतांना चिमनाबागापूर च्या नावे टीएस दिला याचा उल्लेख गट विकास अधिका-यांच्या अहवालात नाही हे नियम बाहय असल्याचे सांगीतले असता **उप मु.का.अ.(म.ग्रा.रो.ह.यो.)** यांनी टीएस देणा-यांनी ही चूक केली आहे असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी भूमापन क्र ४१२ वर अंजनगाव या ठिकाणी सिमेंट बंधा-याचे काम दाखविण्यात आले असुन एस्टीमेट वर देविदास भोसले यांचे नाव आहे. परंतु सदहु जागा भगवंत शिंदे यांची असल्याचे सांगुन या जागेची विक्री कधीच झाली नाही. तरी गट विकास अधिका-यानी याची तपासणी केली काय ? अशी विचारणा केली.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी नामदेव किनाके यांचे ऑनलाईन मस्टरवर नाव आहे परंतु मॅन्युअल मध्ये नाव नाही. सदर नावाची व्यक्ती ही मयत असुन त्यांचे नावाची मजुरी बँकेतून काढलेली आहे तसेच श्री. साहेबराव समासे, व देविदास विठाले हे सुध्दा मयत असतांना त्याचे नावे देखील पैसे काढण्यात आले असल्याचे सांगीतले. त्यावर उप मु.का.अ.(म.ग्रा.रो.ह.यो. ) यांनी उक्त प्रकरणी फेर चौकशी करण्यात येईल असे सभागृहासमोर मत व्यक्त केले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी गावातील कुटुंबसंख्या २१३ असतांना त्या ठिकाणी ४४६ कुटुंब संख्या दर्शवुन डबल जॉब कार्ड देण्यात आले व रहीवाशी नसलेले लोकं घेतले. परंतु चौकशी अहवालामध्ये याचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे दिनांक २०.६.२०१४ रोजी मी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबतही चौकशी अहवालात उल्लेख नाही. तसेच सन २००९ मध्ये एकाच जागेवर तिन ठिकाणी कामे केलीत. शौचालय नसतांना निधी काढला, सिमेंट बंधारे व नाला सरळीकरण ची कामे नियमानुसार नाहीत यावरुन जवळपास रक्कम रुपये दोन कोटीचा घोटाळा आहे व आजही त्याच जागेवर नवीन कामे सुरु आहेत तरी सदहु कामे थांबविणे आवश्यक असल्याचे व्यकत केले. यावर **मा.मु. का. अ.** यांनी जिल्हा स्तरावरुन पुढील कार्यवाही करीता चौकशी समिती नियुक्त करुन लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल असे सांगीतले. सदहु विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती)** यांनी इतके गंभीर प्रकरण सन्मा. सदस्य यांनी प्रशासनासमोर आणून दिले परंतु बीडीओ च्या अहवालात हे मुद्दे का नाही असे सांगुन लोकप्रतिनधींनी उपस्थित केलेल्या मुद्यावर अधिकारी गंभीरपणे कार्यवाही करीत नसल्यामुळे उक्त प्रकरणात जे जे दोषी आहेत त्यांचेवर कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे व्यक्त केले.

**जिल्हा आरोग्य अधिकारी** यांनी मागील सभेत आरोग्य विभागात चो-यांचे प्रमाण वाढत असल्यामुळे कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा गार्ड पुरविण्यात यावे या बाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर मु.ले.वि.अ. यांनी अंदाजपत्रकामध्ये तरतूद करावी लागेल व त्यानंतर पुढील प्रक्रीया करणे सोईचे होईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी धडक सिंचन विहीरींचा निधी त्वरीत देण्यात यावा कारण शेतक-यांना वेळेवर निधी देण्यात येत नाही. तरी त्या बाबत पंचायत समिती स्तरावरील ग. वि.अ. यांना लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे असे सांगीतले. त्यावर का.अ.( सिंचन ) यांचे प्रतिनिधीने आजपावेतो एकंदर ४००० प्रस्ताव म.ग्रा.रो.ह.यो.मध्ये वळती केले, परंतु एकही प्रस्ताव मंजुरीसाठी प्राप्त झाला नाही. व दिनांक ३०.७.२०१४ पर्यंत मुदत असल्यामुळे शेतक-यांनी घाईघाईने स्वतः च्या पैशातून विहीरींची कामे केलीत आणि म.ग्रा.रो.ह.यो. च्या अटीनुसार शेतक-यांना फक्त रुपये १ लाख देणे शक्य आहे असे सांगुन वस्तुतः शेतक-यांचा खर्च अधिक झालेला असल्याचे सांगीतले. यावर **सन्मा. सदस्य श्री. प्रविण वि. देशमुख** यांनी मुदत वाढ मिळणेबाबत यापुर्वीच स्थायी समिती मध्ये ठराव घेण्यात आला असल्याचे सांगुन विभागाकडुन पाठपुरावा करण्यात यावा असे सांगीतले. सदर विषयाबाबत **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी आता नविन सुचनांनुसार विहीरी म.ग्रा.रो.ह.यो. मध्ये समाविष्ट करण्यासाठी ग्रामसभेच्या ठरावाची आवश्यक आहे. तरी स्थायी समिती मधील सूचनांचा संदर्भ देऊन सर्व पंचायत समितीना कळविण्या बाबतचे **निर्देश उप मु.का.अ.(पंचा.) यांना दिले.**

**मा.सभापती (शि.व आ.स) श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी केगाव- मारेगाव रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजने मधुन प्रस्तावित आहे परंतु काम बंद असण्याचे कारण काय, याबाबतची माहिती देण्यात यावी अशी विचारणा केली असता का.अ.(प.प्र.ग्रा.स.यो.) यांनी सदर रोडवर अतिक्रमण असुन ग्रामपंचायती कडून तसा ठराव प्राप्त झाला असल्याने प्रथम अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करुन रोडचे काम सुरु करण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी मागील सभेत प्रत्येक विभागाकडे शासनाकडून किती निधी आला व किती खर्च झाला आणि नियोजन काय करण्यात आले या याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर का. अ. बांध. क्र. १ जि. प. कडून या वर्षी ८८ कोटींचा प्रस्ताव पाठविण्यात आला असुन त्यापैकी रुपये २२ कोटी प्राप्त झाले असल्याचे सांगीतले. त्याच प्रमाणे **मु.ले.वि.अ.यांनी** यासबंधी विषय समितीकडून निर्णय घेण्यात येत असल्याचे सांगुन कामांची यादी विभाग निहाय पुरविण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी मागील सभेत वीज वितरण कंपनी कडून कृषि संजीवन योजनेतून ट्रान्सफार्मर बसविण्यास टाळाटाळ केली जाते व कनेक्शन सुध्दा दिले जात नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर विज वितरण कंपनीचे अधिक्षक अभियंता यांनी जिल्हयातील एकूण २५६ ट्रान्सफार्मर बंद पडले आहेत. व ते ट्रान्सफार्मर दुरुस्ती करण्यामध्ये अडचणी असल्याचे सांगुन शेतक-यांना पुरविण्याकरिता नविन ट्रान्सफार्मर विज वितरण कंपणीकडे उपलब्ध नसल्याचे सांगीतले. त्यावर **मा.सभापती (अर्थ व बांध.स.) श्री. सुभाष म. ठोकळ** यांनी मौजे वडगाव व पाथ्रडदेवी येथिल ट्रान्सफार्मरसाठी पैशे भरुनही आजपर्यंत त्या ठिकाणी ट्रान्सफार्मर बसविण्यात आले नसल्याचे सांगुन ट्रान्सफार्मर जर उपलब्ध नसतील तर कंपनीकडून ट्रान्सफार्मरची मागणी करण्यात यावी.त्याचप्रमाणे मौजे ब्रम्ही या ठिकाणी देखील मागील दीड महिन्यापासून ट्रान्सफार्मर लावण्यात आल नसल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ.संगीता अ. राजूरकर** यांनी बील भरुनही दोन महिन्यापासून ट्रान्सफार्मर लावलेले नाही व पुन्हा लोड शेडींग सुरु झाली आहे त्यामुळे प्रा.आ.के. आरोग्य केंद्रात लाईन नसल्यामुळे प्रसुतीगृहात मोठी अडचण येत असल्याचे सांगीतले. **त्यावर अधिक्षक अभियंता** विज वितरण कंपणी यांनी हॉस्पीटलसाठी नवीन फीडर देता येईल. असे सांगुन लोड शेडींगबाबत नव्याने प्रसिध्दी देण्यात येईल असे सांगीतले. तसेच आमचे प्रयत्न सुरु आहेत व मागिल ५० वर्षात जे झाले नाही ते काम माझ्या कालावधीत झाले असुन नऊ प्रस्ताव शासनाकडे पाठविले त्यापैकी तिन चे कामे सुरु झाले असल्याचे सांगीतले. सदहु विषयावर चर्चा होऊन मा.सभापती (स्थायी समिती) यांनी माळ पठारावरील पाणी पुरवठयासाठी देखील कोटेशन मंजुर होत नाहीत असे सांगीतले असता का.अ.विज वितरण कंपनी यांनी पाणी पुरवठयाचे नविन कनेक्शन एका महिन्यात देण्यात येईल असे सांगुन इन्फ्रा मध्ये असलेले प्रस्तावानां सहा महिन्याचा कालावणी लागणार आहे. त्याचप्रमाणे मौजे बेलोरा या ठिकाणी एक्सप्रेस फीडर लावण्यात येईल तरी यासाठी एजंसी ने खर्च करावा असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी मौजे राळेगाव, बाभुळगाव, कळंब, या तालुक्यासाठी असलेले फीडर बंद पडल्यास दुसरा पर्याय नसते असे सांगीतले असता वि.वि.कंपनीचे का.अधि.यांनी तालुक्यांसाठी १३२ केव्हीची योजना मंजुर झाली असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी लोड शेडींगच्या वेळेत बदल केल्यामुळे या तालुक्यांना अडचण झालेली आहे. त्याचप्रमाणे आठवडी बाजाराच्या दिवशी देखील लाईन नसते, तरी पुर्वीचाच टाईम ठेवण्यात यावा असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री प्रविण वि. देशमुख** यांनी अनपेक्षित लोड शेडींग मुळे शेतातील मोटारी जळत असल्यामुळे हे दिवस निघून गेल्यास कास्तकारांनी ओलीत केव्हां करायचे ? असे सांगुन कंपनीने या दोन महिन्यात कांही न केल्यास आधीच अडचणीत असलेले शेतकरी संपून जातील व कंपनीला वेगळया प्रसंगाला सामोरे जावे लागेल असे सांगेल तसेच **मा.सभापती (स्थायी समिती)** यांनी मौजे शिवनी होरकड येथिल ट्रान्सफार्मर ची नोंद करुन घेण्याबाबत विज वितरण कंपनीचे का. अ. यांना सुचविले .

**जिल्हा आरोग्य अधिकारी** यांनी मौजे कायर, शिवणी, भांबोरा, कोंडूली आरोग्य केंद्राची देयके मिटर रिडींगनुसार आलेली नसल्याचे सांगीतले असता का.अ. विज वितरण कंपनी यांनी सदहु देयके दुरुस्ती करुन देण्यात येईल असे सांगीतले.

**मा.सभापती (शि.व.आ.स) श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी मौजे चोपन ता.मारेगाव येथिल ट्रान्सफार्मर जळाल्यामुळे ५० पंप बंद आहेत, पैशे भरुनही कंपनी कडून लक्ष दिल्या जात नसल्याचे सांगुन अवैध कनेक्शन सुरु असल्याचे सांगीतले. त्यावर का.अ. वि.वि.कं. यांनी मौजे चोपन व सावंगी बाबतची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल त्याचप्रमाणे अवैध कनेक्शन ची माहिती घेऊन नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. देवानंद न. पवार** यांनी विज वितरण कंपणी कडुन जाणून बुजुन ट्रान्सफार्मर जळाले असल्याचे दर्शविले जाते असे सांगुन १४० ट्रान्सफार्मर जळाले बाबत विज वितरण कंपनी कडील अहवाल असल्याचे सांगीतले असता.वि.वि. कं. चे का. अधि. यांनी असे काहीच नाही असे सांगीतले.

**ठराव क्र. १ :- दिनांक १८.१०.२०१४ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेच्या अहवालास ही सभा मंजुरी प्रदान**

**करते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र. २ :- शासन आदेश व परिपत्रकाचे वाचन करणे.**

१) उप मु. का. अ.(पं.) यांनी राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवलेल्या जिल्हा निधी बाबत कक्ष अधिकारी महाराष्ट शासन क्रमांक क्र २०१४/प्र.क्र.२६/वित्त ३, ग्रा.वि.व जल. विभाग मुंबई -४००००१ दिनांक ११ ऑगष्ट २०१४ चे वाचन केले.

२) का.अ.(पा.पु) यांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण ) ची अंमलबजावणी करणेबाबत महाराष्ट्र शासन पा.पु. स्वच्छता विभाग शा.प. क्र.स्वभामि-२०१४/ प्र.क्र.२७/पापु/०८, दि.७ नोव्हेंबर २०१४ चे वाचन केले.

**विषय क्र. ३ :- जिल्हा ग्राम विकास निधी माहे ऑगस्ट व सप्टेंबर-२०१४ पर्यंत झालेल्या जमा खर्चास मंजुरात मिळणेबाबत.**

विषयाची माहिती उप मु.का.अ. (पं.) यांनी सभेला दिली. जिल्हा ग्राम विकास निधीच्या जमा खर्चास मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम-१३६ अन्वये स्थायी समितीची सभेची मंजूरात घेणे आवश्यक आहे. माहे ऑगस्ट व सप्टेंबर-२०१४ पर्यंत प्राप्त झालेल्या जमा खर्चाचे विवरण मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे. कृपया प्रस्तावास मंजूरी द्यावी ही विनंती. **त्यावर मा. सभापती (स्थायी समिती )** यांनी सभागृहाचे संमतीने खालीलप्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र. २:- मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम-१३६ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधी माहे ज्ऑगस्ट व सप्टेंबर-२०१४ मध्ये झालेल्या जमा खर्चास ही सभा खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| | | |
|---|---|---|
| १ | महिन्यातील सुरवातीची शिल्लक | १०,१७,०८,१९१,.४१ |
| २ | महिन्यातील प्राप्त रक्कम रुपये | ७२,२६६,.०० |
| ३ | एकुण जमा रक्कम रुपये | १०,१७,८०,४५७,.४१ |
| ४ | महिन्यातील झालेला खर्च रक्कम रुपये | निरंक |
| ५ | महिन्यातील अखेर शिल्लक रक्कम रुपये | १०,१७,८०,४५७,.४१ |

**ठरावावर कोणतीही उपसूचना आली नाही, ठराव सर्वानूमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्रं. ४ :- मा.श्री.प्रि.शं.काबळे.कक्ष अधिकारी ,ग्राम विकास व जलसंधारण विभाग बांधकाम भवन, मर्झबन रोड फोर्ट मुंबई ४००००१ यांचे पत्र क्र २०१४/प्रक्र २६/वित्त-३ दिनांक ११/८/२०१४ नुसार जिल्हा ग्राम विकास निधीच्या बचत खात्यांत एकुण रु. ४७,५०,०००/ फक्त दोन वर्षाचे मुदती करीता मुदत ठेव योजनेत सेंट्रल बॅक ऑफ इंडिया शाखा दर्डा नगर यवतमाळ येथे गुंतवणूक करण्याबाबत.**

विषयाची माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी सभेत दिली. उपरोक्त पत्रान्वये जिल्हा ग्राम विकास निधीचे खाते व वेळोवेळी गुंतवणूक केलेली रक्कम सुरक्षीत राहण्याचे दृष्टीने शासनाचे पत्र क्र.२०१४ प्रक्र२६/वित्त-३ दिनांक ११/८/२०१४ चे पत्रान्वये राज्यातील बीड, उस्मानाबाद ,वर्धा, नागपूर, बुलढाणा, नांदेड येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची आर्थिक स्थिती डबघाईला आल्याने तसेच रिझंव्ह बॅंकेने वरील बॅंकेचे परवाने नुतनीकरण न केल्याने वरील बॅंकेची खाती बंद करुन राष्ट्रीयकृत बॅंकेत खाती उघडण्यांस परवानगी देण्यांत आली आहे. जिल्हा निधीचे बचत खात्यांत जमा असलेली रक्कम रुपये ४७,५०,०००/- फक्त (अक्षरी सतेचाळीस लाख पन्नास हजार फक्त ) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत गुंतवणूक करण्यांस मंजूरी करीता दिनांक ३०/८/२०१४ रोजीचे स्थायी समितीचे सभेत विषयांस मंजुरी घेण्यांत आली आहे. तथापी गुंतवणूक करावयाचा असलेला निधी रु.४७,५०,०००/-फक्त( सतेचाळीस लाख पन्नास हजार फक्त ) राष्ट्रीयकृत बॅंक **सेंट्रल बॅक ऑफ इंडिया शाखा दर्डा नगर यवतमाळ** येथील बॅंकेत दोन वर्षाचे मुदतीकरीता गुंतवणूक करण्यांस मंजूरी प्रदान करावी.तसेच यापूर्वी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत गुंतवणूक केलेली रक्कम ज्यावेळी त्या रक्कमेची मुदत संपते त्यावेळी ती रक्कम राष्ट्रीयकृतबॅंक विदर्भ क्षेत्रीय ग्रामीण

बँक दत्त चौक शाखा यवतमाळ येथील बँकेत गुंतवणूक करण्यात येईल. अंतीम मुदत असलेल्या प्रमाणपत्राचा तपशिल खालीप्रमाणे

| अ.क्र | तपशिल | शिल्लक रक्कम |
|---|---|---|
| १ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ खाते क्र.०००१ मध्ये जमा | ४७,५८,१८२.४१ |
| २ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ येथे ३ वर्षाकरीता पुर्नगुंतवणूक केलेली आहे. पावती क्र.०२४१५७ दि.१५-११-०१२ ते दिनांक १५-११-२०१५ व्याजाचा दर ८.५०% | ४,८९,०१,६३७.०० |
| ३ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यवतमाळ येथे दोन वर्षाकरीता मुदत ठेवीत गुंतवणूक केलेली आहे. पावती क्र. २४७०२६ दि.२२-६-०१३ ते दिनांक २२-६-२०१५ व्याजाचा दर ९% | १,७३,९८,८३७.०० |
| ४ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवित रक्कम गुंतवणूक करण्यात आलेली आहे. पावती क्र. ००००७७८ दि.५/५/२०१३ ते दि.५/५/२०१५ व्याजाचा दर १०% | १,७७,००,०००.०० |
| ५ | जिल्हा मध्यर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवीत रक्कम गुंतवणूक करण्यात आलेली आहे. पावती क्र.००६४३४९ दिनांक ७/१/२०१४ ते दि.७/१/२०१६ व्याजाचा दर १०.५०% | ५९,४९,५३५.०० |
| ६ | जिल्हा मध्यर्ती सहकारी बँकेत २ वर्षाकरीता मुदत ठेवीत रक्कम गुंतवणूक करण्यात आलेली आहे. पावती क्र.००००२१० दि. १३/२/०१३ ते दि.१३/२/२०१५ व्याजाचा दर १०.% | ७०,००,०००.०० |
| | **एकुण** | **१०,१७,०८,१९१.४१** |

रुपये ४७,५०,०००/- फक्त (अक्षरी सतेचाळीस लाख पन्नास हजार फक्त ) राष्ट्रीयकृत बँक **सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दर्डा नगर वडगाव रोड यवतमाळ** येथे दोन वर्षाचे मुदतीकरीता गुंतवणूक करण्याचे प्रस्तावित असुन सदर विषयाचे प्रस्तावाला तुर्त स्थायी समिती चे सभेत मंजुरी घेऊन त्यास पुढील होणा-या जि. प. सर्वसाधारण सभेची मंजुरी करिता सादर करण्यात येईल. कृपया विषयास मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध.राठोड** यांनी सहकारी बँका आर्थिक डबघाईस आल्यामुळे शासनाने नवीन जीआर काढला आहे. त्या जीआर नुसार कार्यवाही करण्यात यावी असे सांगुन जिल्हा मध्यवर्ती बँके मध्ये सन्मा. सदस्यांनी सुचविलेली कामे केली जात नसल्यामुळे सदर बँकेतुन रक्कम काढून घेऊन शासन निर्णयानुसार ठेवी ठेवण्यात याव्यात असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. प्रविण वि.देशमुख** यांनी बँकेत गुंतविलेल्या रकमेची मुदत संपण्याच्या आधी रक्कमा काढता येणार नसल्याचे सांगीतले तसेच जिल्हा मध्यवर्ती बँके मार्फत सुरु असलेले जि.प.चे सर्व आर्थिक व्यवहार सुरळीतपणे सुरु असल्यामुळे कोणतेही कारण नसतांना बँकेतील ठेवी काढणे योग्य होणार नाही असे मत व्यक्त केले. **त्यावर प्रभारी उप मु.का.अ. (पंचा.)** यांनी सभेसमोर सादर केलेला प्रस्ताव हा शासन निर्णयातील निर्देशानुसार सादर करण्यात आला असुन यापुढील ठेवी सेन्ट्रल बँकेत गुंतवनुक केल्या जाणार असल्याचे सांगीतले.

**वरीलप्रमाणे चर्चे अंती मा. सभापती (स्थायी समिती )** यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं. ३ :- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शासनाचे पत्र क्र २०१४/प्रक्र २६ / वित्त-३ दिनांक ११/८/२०१४ नुसार जिल्हा ग्राम विकास निधीच्या बचत खात्यांतील रुपये ४७,५०,०००/- फक्त (अक्षरी सतेचाळीस लाख पन्नास हजार फक्त ) राष्ट्रीयकृत बँक सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा दर्डा नगर वडगाव रोड यवतमाळ येथे दोन**

**वर्षाचे मुदतीकरीता गुंतवणूक करण्यास जिल्हा परिषद सर्व साधारण सभेची मंजूरी प्राप्त होणेकरिता ही सभा शिफारस करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**--मा. अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय ३**

**विषय क्रं. ५ :- मौजे पन्हाळा क्र. १ पाझर तलावाचे बांधकाम करणे ता. पुसद जि.यवतमाळ निविदा मंजुरी बाबत रू.४३,७६,७७५/-**

विषयाची माहिती का.अ.(सिंचन) जि.प. यवतमाळ यांनी सभेत दिली. मौजे पन्हाळा क्र.१ पाझर तलावाचे बांधकाम करणे ता. पुसद जि. यवतमाळ चे कामा बाबतची निविदा दि.५/२/२०१४ रोजी on Line तथा वृत्तपत्रातुन निविदा मागविण्यात आल्या असून on Line निविदा दि.१०/६ /२०१४ रोजी उघडल्या असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

| SlNo | Bildder Name | Amount as per Sechudle 'B' | Bid Rank | Quoted Percentage | Amount as per Quoted rate |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Shri Santosh Manik Chavhan | 43.76,775/- | L-1 | 9.00 | 47,70,685/- |
| 2 | M/s Trimurti Construction Company | 43,76,775/ | L- 2 | 11.00 | 48,58,220/- |
| 3 | k.d.sharma | 43,76,775/ | L-3 | 13.00 | 49,45,766/- |

वरील कंत्राटदारा पैकी **श्री.संतोष एम. चव्हाण रा. पुसद** यांची निविदा सर्वात कमी दराची **(९.००%)** अक्षरी नऊ पूर्णांक शुन्य टक्के अधिक दराने भरली आहे. सदर दर खात्याला जास्त वाटत असल्यामुळे कंत्राटदार यांचेशी वाटाघाटी करण्यांत आली असून कंत्राटदार यांनी सदर निविदा श्येडयुल दरापेक्षा **९९,७९०**/- (रुपये नव्यानऊ हजार सातशे नव्वद फक्त )अधिक मुल्याने करण्यास तयार असल्याचे लेखी लिहून दिलेले असून, **टक्केवारी** मध्ये (२.२८%) दोन पूर्णांक अठ्ठाविस टक्के इतके येते. र्निवदेची वाढीव मुल्यासह किंमत रु.**४४,७६,५६५**/- इतकी होते.

सदरहु कामाची फेर निविदा बोलविल्यास आजमितीस दरसूचीमध्ये ११% अधिक दराने वाढ झालेली असून, ती आर्थिकदृष्टया योग्य होणार नाही. त्यामुळे जि.प.लेखा संहिता कलम १३९(३) नुसार वरील प्रमाणे अधिक दराची निविदा स्विकृत करण्याचे शिफारर्शास्तव सादर.

सदर काम सन **२०११.२०१२** चे प्रचलीत दरसुची नुसार असून कामा वरिल खर्च **<u>२७०२-७१०९ ल.पा.सामान्य बिगर आदीवाशी</u>** या शिर्षकातील प्राप्त अनुदानातुन करावयाचा आहे.

सदर मुळ निविदा **रूपये४३,७६,७७५**/-किंमतीची असल्यामुळे निविदा स्विकृतीचे अधिकार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ तथा लेखा संहिता १३९ (३) मधील तरतुदी नुसार तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक/झेडपिए/२०१२ /प्र क्र ६८०/वित्त-९ दिनांक १९ मार्च,२०१२ नुसार निविदा मंजुरीचे अधिकार जिल्हा परिषद स्थायी समितीचे सभेस असल्याने विषय मंजूरीस्तव स्थायी समिती समोर सादर. कृपया मंजूरी प्रधान करावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती** ) यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्रं.४:- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२६ तथा लेखा संहिता १३९ (३) मधील तरतुदी नुसार तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक/ झेडपिए /२०१२ /प्र क्र ६८०/ वित्त-९ दिनांक १९ मार्च,२०१२ नुसार . श्री.संतोष एम. चव्हाण रा. पुसद यांची श्येडयुल दरापेक्षा ९९,७९०/- (रुपये नव्यानऊ हजारसातशे नव्वद फक्त )अधिक मुल्याने मौजे पन्हाळा क्र. १ पाझर तलावाचे बांधकाम करणे ता. पुसद जि.यवतमाळ यांची रू.४३,७६,७७५/- निविदा स्विकृतीस ही सभा मान्यता प्रदान करते. तसेच सन २०११.२०१२ चे प्रचलीत दरसुची नुसार कामा वरिल खर्च २७०२-७१०९ ल.पा.सामान्य बिगर आदीवासी या शिर्षकातील प्राप्त अनुदानातुन भागविण्यात यावा.**

**विषय क्रं.६ सामान्य प्रशासन विभागामधील सेवा विषयक नोंदवहयातील नोंदी पूर्णत्वाचे माहे जुलै-ते सप्टेंबर-२०१४ च्या त्रैमासिक अहवालास मान्यता प्रदान करण्याबाबत.**

विषयाची माहीती उप मु. का. अ. (सा.) यांनी सभेत दिली. सामान्य प्रशासन, विभागातील लेखा विषयक नोंदवहयातील नोंदी पूर्ण असल्या बाबतचा माहे माहे जुलै ते सप्टेंबर - २०१४ या कालावधीचा त्रैमासिक अहवाल मा. आयुक्त अमरावती विभाग, अमरावती यांना सादर करावयाचा आहे. तथापि सदर नोंदवहयाचे अहवालास स्थायी समितीची मंजूरीची आवश्यकता आहे.

कृपया नोंदवहयातील नोंदी पूर्ण असल्याबाबतच्या अहवालास मंजूरात प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर सदर विषयावर **सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी लेखा विषयक नोंदवहया सभेमध्ये ठेवण्यात याव्यात असे मत व्यक्त केले असता **सचिवांनी** यापुढे खाते वहया सभेमध्ये ठेवण्यात येतील असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती )** यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र ५ सामान्य प्रशासन विभागातील लेखा विषयक नोंदवहया माहे जुलै ते सप्टेंबर- २०१४ या कालावधीतील पुर्ण असल्याचा त्रैमासिक अहवाल मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना पाठविण्यास ही सभा मंजुरी प्रदान करते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.७:- शाळा इमारत निर्लेखित करणेबाबत. (वर्गखोल्या) पंचायत समिती यवतमाळ मधील मंगरूळ येथील शाळेच्या ०२ वर्गखोल्या निर्लेखनाबाबत.**

विषयाची माहिती शि.अ.(प्राथ.) यांनी सभेत दिली. पंचायत समिती,यवतमाळ अंतर्गत खालील शाळा इमारत (वर्ग खोल्या) निर्लेखित करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.सदर प्रस्तावाला उपअभियंता जि.प. बांधकाम उपविभाग,यवतमाळ यांनी इमारत (वर्गखोल्या) निर्लेखित करणेकरिता लागणाऱ्या तरतुदीला मान्यता दिली आहे. तेव्हा सदर इमारत (वर्गखोल्या) निर्लेखित करणेकरिता प्राकलणास मंजुरीस्तव स्थायी समितीचे सभेसमोर ठेवण्यात येत आहे.

कृपया उपरोक्त प्राकलनास तथा प्रस्तावास मंजुरात प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती )** यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.६:- पंचायत समिती, यवतमाळ मधील जि.प.उ.प्राथ.शाळा मंगरुळ येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या ०२ वर्ग खोल्या निर्लेखीत (ईमारत पाडणे) करणेबाबतच्या प्रस्तावाचे प्राकलनास ही सभा खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान करते.**

| अ.क्र. | शाळेच नाव | पंचायत समिती | निर्लेखित करावयाच्या वर्गखोल्या | प्राकलन रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जि.प. उ.प्राथ.शाळा मंगरुळ | यवतमाळ | ०२ | ५३,४४०/- |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.८:- मौजे पार्डी हिवरा रस्ता कि.मी.०/०० ते १/०० व १/५०० ते २/५०० ,३/०० ते ४/०० मध्ये दुरुस्ती करणे ता.कळंब कामाच्या निवीदेस मंजुरी मिळणेबाबत.**

विषयाची माहिती कार्यकारी अभि.बांध.क्र.१ यांनी सभेत दिली. खालील नमुद केलेल्या कामांकरिता http :/mahatenders.Gov.in/nicgep/app या संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करुन निवीदा मागविण्यात आल्या होत्या, या निविदा मा. मु.का.अ. व का.अभि. बांध क्र.१ यवतमाळ यांच्या डीजीटल - ई स्वाक्षरीने ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात आल्या असुन त्यात प्राप्त निवीदांचे तुलनात्मक विवरण तयार करण्यात येऊन स्पर्धात्मकरित्या प्राप्त सर्वात कमी दराच्या निविदाधारकांचा तपशिल खालीलप्रमाणे दर्शविण्यात आला आहे.

प्रस्तुत निविदेतील अनुक्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या निवीदेची रक्कम ही जि. प. स्थायी समिती सभेच्या अधिकार कक्षेत येत असल्यामुळे स्पर्धात्मकरित्या प्राप्त निवीदा मधुन न्युनतम दराची निविदा वित्त विभागाच्या संहमतीने जि. प. स्थायी समिती सभेपुढे मंजुरीकरिता सादर करण्यात येत आहे. कृपया उक्त कामाच्या निवीदेस मंजुरी प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती )** यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.७:- कार्य.अभियंता, बांध.क्रं.१ यांनी प्रस्तावीत केलेल्या मौजे पार्डी हिवरा रस्ता कि.मी.०/०० ते १/०० व १/५०० ते २/५०० ,३/०० ते ४/०० मध्ये दुरुस्ती करणे ता. कळंब कामाच्या खालील प्रमाणे न्युनतम दराची निविदा निवीदा स्विकृतीस ही सभा मान्यता प्रदान करते.**

| अ.क्र | कामाचे नाव | कामांची अंदाजीत किंमत | प्राप्त निविदाधारकाचे नाव | निविदेतील नमुद दर | सर्वात कमी दराची निविदा | न्युनतम दर असलेल्या निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पार्डी हिवरा रस्ता कि.मी. ०/०० ते १/०० व १/५०० ते २/५०० ,३/०० ते ४/०० मध्ये दुरुस्ती करणे ता.कळंब. | ४३६४४२९/- | मे. साई कन्ट्रक्शन नेताजी चौक यवतमाळ | शेडयुल बी दरापेक्षा७.४८ % कमी दराने | शेडयुल बी दरापेक्षा७.४८ % कमी दराने किंमत रुपये४०३७९७०/- | मे. साई कन्ट्रक्शन नेताजी चौक यवतमाळ |

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र ९: सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप पुरविण्याचे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

विषयाची माहिती कृषि विकास अधिकारी यांनी सभेत दिली. जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप पुरविण्याचे योजनेकरिता जि.प.च्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात रु.२५,००,०००/- ची तरतुद करण्याबाबत दिनांक १०/०७/२०१४ चे जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये ठरले आहे.

सदर योजना म.रा. जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० मधिल अनुसुचि १ चे बाब क्र.३ नुसार राबवावयाची आहे.योजनेचा लाभ ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या सर्व साधारण शेतक-यांना दयावयाचा आहे. प्रति शेतकरी १ नग बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप पंचायत समिती स्तरावरुन देण्यात येईल. योजने अंतर्गत बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंपाची खरेदी दर कराराप्रमाणे करण्यात येईल. सेस मधुन रु.२५,००,०००/- व शेतकरी वाटा रु. १०,७१,४२८/- अशी एकुण रक्कम रु.३५,७१,४२८/- ची योजना आहे.

सदर योजना रू.३५,७१,४२८/- ची असल्यामुळे ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/वित्त-९,मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जि.प.चे स्थायी समितीचे सभेला आहे. तेव्हा योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता विषय सभेसमोर सविनय सादर. कृपया मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती )** यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.८:- ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/वित्त-९, मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ नुसार सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर सेस मधुन रु.२५,००,०००/- व शेतकरी वाटा रु. १०,७१,४२८/- अशी एकुण रक्कम रु.३५,७१,४२८/- ची बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप पुरविण्याचे योजनेस ही सभा प्रशासकीय मंजुरात प्रदान करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.१०: सन २०१४ - १५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे. पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर नॅपसॅक स्प्रेपंप पुरविण्याचे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

विषयाची माहिती कृषि विकास अधिकारी यांनी सभेत दिली. जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर नॅपसॅक स्प्रेपंप पुरविण्याचे योजनेकरिता जि.प.च्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात रु.२०,००,०००/- ची तरतुद करण्याबाबत दिनांक १०/०७/२०१४ चे जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये ठरले आहे.

सदर योजना म.रा. जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० मधिल अनुसुचि १ चे बाब क्र.३ नुसार राबवावयाची आहे.योजनेचा लाभ ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या सर्व साधारण शेतक-यांना दयावयाचा आहे.प्रति शेतकरी १ नग नॅपसॅक स्प्रेपंप पंचायत समिती स्तरावरुन देण्यात येईल. योजने अंतर्गत नॅपसॅक स्प्रेपंपाची खरेदी कृषि आयुक्तालयाचे दर कराराप्रमाणे करण्यात येईल. सेस मधुन रु.२०,००,०००/- व शेतकरी वाटा रु. ८,५७,१४२/- अशी एकुण रक्कम रु.२८,५७,१४२/- ची योजना आहे.

सदर योजना रू.२८,५७,१४२ /- ची असल्यामुळे ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/ वित्त-९,मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार जि.प.चे स्थायी समितीचे सभेला आहे. तरी योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता विषय सभेसमोर सविनय सादर करण्यात येत आहे. कृपया मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती.

**ठराव क्र.९:-ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपीए- २०१२ /प्र क्र ६८०/ वित्त- ९, मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ नुसार सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७०% अनुदानावर नॅपसॅक स्प्रेपंपाची खरेदी कृषि आयुक्तालयाचे दर कराराप्रमाणे सेस मधुन रु.२०,००,०००/- व शेतकरी वाटा रु. ८,५७,१४२/- अशी एकुण रक्कम रु.२८,५७,१४२/- ची योजना पुरविण्याचे योजनेस ही सभा प्रशासकीय मंजुरात प्रदान करते.**
**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**विषय क्र.११ : सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७५%अनुदानावर पिव्हिसी पाईप पुरविण्याचे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

विषयाची माहिती कृषि विकास अधिकारी यांनी सभेत दिली. जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७५% अनुदानावर पिव्हिसी पाईप पुरविण्याचे योजनेकरिता जि.प.च्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात रु.३१,५०,०००/- ची तरतुद करण्याबाबत दिनांक १०/०७/२०१४ चे जि.प.सर्वसाधारण सभेमध्ये ठरले आहे.

सदर योजना म.रा. जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम १०० मधिल अनुसुचि १ चे बाब क्र.३ नुसार राबवावयाची आहे.योजनेचा लाभ ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या सर्व साधारण शेतक-यांना दयावयाचा आहे.प्रति शेतकरी १० नग पिव्हिसी पाईप पंचायत समिती स्तरावरुन देण्याचे प्रस्तावित आहे. योजने अंतर्गत पिव्हिसी पाईपची खरेदी महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ मर्या यांचे दर कराराप्रमाणे करण्यात येईल. सेस मधुन रु.३१,५०,०००/- व शेतकरी वाटा रु. १०,५०,०००/- अशी एकुण रक्कम रु.४२,००,०००/- ची योजना आहे.

सदर योजना रू.४२,००,०००/- ची असल्यामुळे ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१२/प्र क्र ६८०/वित्त-९,मंत्रालय मुंबई दि.३१ जानेवारी २०१३ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे

अधिकार जि.प.चे स्थायी समितीचे सभेला आहे. तरी योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता विषय सभसमोर सविनय सादर. कृपया मान्यता प्रदान करण्यात यावी ही विनंती. सदर विषयावर चर्चा होऊन **मा. सभापती (स्थायी समिती )** यांनी सभागृहाचे संमतीने खालील प्रमाणे ठराव सभेत मांडला.

**ठराव क्र.१०:-ग्राम विकास व जल संधारण विभागाचा शासन निर्णय क्र. झेडपीए- २०१२/प्र क्र ६८०/वित्त- ९, मंत्रालय मुंबई दि. ३१ जानेवारी २०१३ नुसार सन २०१४-१५ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातुन ७ हे.पर्यंत जमिन धारण करणा-या शेतक-यांना ७५% अनुदानावर पिव्हिसी पाईपची खरेदी महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ मर्या यांचे दर कराराप्रमाणे सेस मधुन रु.३१,५०,०००/- व शेतकरी वाटा रु. १०,५०,०००/- अशी एकुण रक्कम रु.४२,००,०००/- च्या पुरविण्याचे योजनेस ही सभा प्रशासकीय मंजुरात प्रदान करते.**

**ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही, ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.**

**<u>विषय पत्रीकेवरील विषय संपल्यानंतर खालीलप्रमाणे चर्चा घडुन आली.</u>**

**मा. सभापती (शि. व आ.स.)श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी प्रभाग समिती मध्ये अधिकारी /कर्मचारी व शाखा अभियंता हे सभेला हजर राहत नसल्याचे सांगीतले. त्यावर **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी प्रभाग समीतीचे वेळी सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित राहणेबाबत कळविण्याचे **निर्देश उप मु.का.अ.(पंचा) यांना दिले.**

**मा. समाज कल्याण अधिकारी** जि. प. यवतमाळ यांनी १० टक्के निधी हा कामाची तपासणी झाल्याशिवाय देता येणार नसल्याचे सांगुन याबाबत मा. आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांचे कार्यालयाकडे मार्गदर्शन मागविण्यात आले असल्याचे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. दिवाकर ध. राठोड** यांनी तांडा वस्ती कामांसाठी जि. प. सदस्यांना प्राधान्य देण्यात यावे असे सांगीतले असता समाज कल्याण अधिकारी यांनी मा.आमदार, मा.खासदार व इतर लोकप्रतिनिधींनी सुचविलेली सर्वांची कामे घेतलेली असल्याची सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी नायगाव पाणी पुरवठा योजना सन १९९४ पासून ग्रा. पं.ला हस्तांतरीत झालेली नाही असे सांगुन त्या ठिकाणी विहीरी साठी जागेचा प्रश्न आहे व अतिक्रमण हटविणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. **त्यावर का.अ. (पा.पु.)** यांनी सदर काम म.जि.प्रा. चे असल्यामुळे त्यांना पत्र दिले आहे. परंतु या बाबतची कागदपत्रे ग्रामपंचायत कडे उपलब्ध नाहीत असे सांगीतले. यावर **सन्मा. सदस्य** यांनी आवश्यक ती कागदपत्रे आजच सभागृहात उपलब्ध करुन देतो परंतु अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी असे सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन **मा.मु. का. अ.** यांनी उक्त विषयाचे सबंधाने प्रकरण पाहून निर्णय घेण्यात येईल असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य श्री. अमन ह. गावंडे** यांनी सबंधीत खातेप्रमुखांने सभागृहात खोटी माहिती पुरविली असल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी असे सांगीतले.

**सन्मा. सदस्य सौ.उमाताई वि. पिदुरकर** यांनी निर्गुडा नदीमध्ये नवरगाव बांधाचे पाणी सोडण्यात यावे असे सुचविले असता मा.सभापती ( स्थायी समिती)यांनी उक्त विषयाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र पाठविण्या बाबतचे **निर्देश का.अ.(पा.पु.)यांना दिले.**

**मा.सभापती ( शि. व आ.स) श्री. नरेंद्र के. ठाकरे** यांनी मौजे चिंचमंडळ व सावंगी पाणी पुरवठा योजनेची माहिती देण्यात यावी असे सांगीतले असता उप अभियंता (भु.स.व वि.यं.) यांनी चिंचमंडळ ची योजना जुनी असुनही ती दुरुस्ती केल्यास त्या ठिकाणी पाणी पुरवठा सुरु होऊ शकतो असे मत व्यक्त केले. तसेच शाखा अभियंताकडून अहवाल येणार आहे त्याचप्रमाणे मौजे सावंगी येथिल जुनी नळ योजना संपुर्णपणे बुजलेली असुन ती दुरुस्त होणार नसल्यामुळे नदीवरुन नवीन योजना घेण्याबाबत एस्टीमेट तयार करण्यात येणार असल्याचे सांगीतले.